# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

## महिला व बाल कल्याण विकास विभाग जाहीर निविदा क्र. ०४/२०२६-२७

इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालविकास विभागामार्फत महिला व युवतीसाठी कराटे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी पात्र व्यक्ती, व्यवसायिक, एजन्सी,संस्था यांचे कडून आधारभूत किमतीच्या जास्तीत जास्त रकमेवर महापालिका अटी शर्तीच्या अधीन राहून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नाव | कालावधी | प्रशिक्षण तास | लाभार्थी संख्या | प्रशिक्षण शुल्क प्रति लाभार्थी +18% GST | बयाणा रक्कम (१ टक्के) | निविदा फॉर्म फी +GST |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कराटे | ६० दिवस | २ तास | १०० | ६५०० | ६५०० | १०००+१८० |

वरील कामे दुहेरी लिफाफा पध्दतीचा अवलंब करणेत येत आहे.

**अ) लिफाफा क्रं. १ खालील कागदपत्रे जोडावीत.**

१) निविदा बयाणा रक्कम व निविदा फॉर्म फी ची रक्कम इचलकरंजी शहर महानगरपालिका या नांवे ऑनलाईन भरणेची आहे.

२) व्यक्ती किवा एजन्सी / संस्था/ व्यवसाय असल्यास संस्था नोंदणी पत्र.

३) आधार कार्ड सत्यप्रत प्रत.

४) पॅनकार्ड सत्यप्रत प्रत.

५) आर्थिक क्षमता चालू ३ वर्षाचे IT परतावा सर्टीफीकेट

६) GST रजिस्ट्रेशन सटीफीकेट

७) EPF रजिस्ट्रेशन सर्टीफीकेट

८) नागरिक / स्थानिक स्वराज संस्था किंवा सहकारी संस्था किंवा तसम संस्थेकडील मागील कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

९) किमान वार्षिक उलाढाल ५० लाख balancesheet असणे आवश्यक आहे.

१०) कोणत्याही शासकिय / निमशासकिय संस्थेच्या काळया यादीत नसलेबाबत चे पत्र.

११) इकडील नमुन्यातील अटी शर्ती मान्य असलेबाबत स्वाक्षरीसह फॉर्म

१२) निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग घेत असताना महानगरपालिकेची कोणतीही येणेवाकी नसल्याबाबत ना-देय प्रमाणपत्र निविदा रक्कमेसोबत सादर करणे बंधनकारक राहील

13) Form 1B (रु.500/- च्या स्टँपपेपरवर)

**ब) लिफाफा क्रं.२ मध्ये खालील कागदपत्रे जोडावेत.**

१. वरील लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रे अपलोड केले नंतर वित्तीय बोलीचा लिफाफा https:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पहावयास मिळतील.

Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती

१) कोरी निविदा ~~https:~~ www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.12/8/26 रोजी स.११.०० पासून दि.20/8/26 रोजी 3.00 वाजेपर्यंत ऑनलाईन पहावयास मिळतील.

२) भरलेली निविदा सादर करण्याची अंतिम दि. 20/8/26/ 3.00 वाजेपर्यंत राहील.

३) शक्य झालेस निविदा दि. 21/8/26/4.30 वाजता उपस्थित मक्तेदाराच्या समोर उघडणेत येईल.

४) कोणतीही निविदा मंजूर अथवा सर्व निविदा नामंजूर करणेचे अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवलेले असून त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.

५) सर्व कामाची अटी व शर्ती महानगरपालिकेच्यामहिला व बाल कल्याण विकास विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

दिनांक -

(अशोक कुंभार )
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपलिका

Scanned with OKEN Scanner

# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी
## महिला व बाल कल्याण विकास विभाग जाहीर निविदा क्र. ०४ /२०२६-२७

इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालविकास विभगामार्फत महिला व युवतीसाठी **कराटे** प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी निविदा.

### अटी व शर्ती -

1. प्रशिक्षण संस्था शासनमान्य व विधिवत नोंदणीकृत असावी संबधित क्षेत्रातील किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.
2. प्रशिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध असाव्यात.
3. प्रशिक्षणार्थींना नियमित उपस्थिती राखणे बंधनकारक राहील.
4. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.
5. प्रशिक्षणादरम्यान उपस्थिती नोंदवही व G P S छायाचित्रे ठेवणे बंधनकारक राहील.
6. विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण केंद्राची तपासणी करण्याचा अधिकार राहील.
7. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) सादर करणे आवश्यक राहील.
8. प्रशिक्षणामध्ये किमान 80% अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक राहील.
9. शासन व महानगरपालिका नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
10. चुकीची माहिती आढळल्यास मंजुरी रद्द करण्यात येईल.
11. प्रशिक्षणार्थीचे वय वर्षे 18 पूर्ण असणे आवश्यक (वया बावतचा पुरावा)
12. इचलकरंजी महानगरपलिका हद्दीतील स्थानिक रहिवाशी असलेबावतचा पुरावा (रेशनकार्ड, आधारकार्ड, मतदान ओळख पत्र,इ.)
14. वरील नमूद प्रत्येक प्रशिक्षणासाठी फक्त १०० लाभार्थी निवड करणेत येणार असल्याने पात्र लाभार्थी प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य प्राप्त अर्जानुसार प्रशिक्षण लाभार्थी यादी निश्चित करणेत येईल तसेच मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
15. वरील नमूद प्रशिक्षणापैकी एकाच प्रशिक्षणाचा लाभ एकाच लाभार्थीला देनेत येईल अन्य प्रशिक्षणासाठी प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही .
16. विधवा महिला तसेच द्वारिद्रय रेषेखालील महिला व मुलीना प्रथम प्राधान्य देणेत येईल
17. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५: प्र.क्र. १५६/०५/नवि-२० मंत्रालय, मुंबई ४०००३२. दि. 30 डिसेबर,२००६ च्या जी. आर नुसार प्रशिक्षण शुल्क रक्कमेच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वतः भरावी.
18. महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुमार कमीत कमी ६० प्रशिक्षणार्थीची नोंद होणे आवश्यक आहे. तरच प्रशिक्षण चालू करण्यात येईल
19. संस्थेने मागील तीन वर्षात अशा प्रकारचे प्रशिक्षण यशस्वीरित्या आयोजित केल्याचे पुरावे सादर करावेत.
20. प्रशिक्षणासाठी आवश्यक पात्र अनुभवी प्रशिक्षक उपलब्ध करून देणे संस्थेची जबाबदारी राहील.
21. प्रशिक्षण कालावधी बॅच ची संख्या व प्रत्येक बॅच मधील प्रशिक्षणार्थीची संख्या महानगपालिकेच्या निर्देशानुसार राहील.
22. प्रशिक्षणासाठी आवश्यक लाभार्थी सर्व साहित्य, उपकरणे, कीट, मशिनरी व इतर शैक्षणिक साधने संस्थेने स्वताच्या खर्चाने उपलब्ध करून द्यावी.
23. प्रशिक्षणाचा दैनंदिन हजेरी रजिस्टर, छायाचित्रे व आवश्यक अहवाल महानगरपालिकेकडे सादर करणे बंधन कारक राहील.
24. प्रशिक्षणादरम्यान सुरक्षा, स्वच्छता व शिस्त राखण्याची संपूर्ण जबाबदारी प्रशिक्षण संस्थेची राहील.
25. प्रशिक्षणाची गुणवत्ता समाधान कारक नसल्यास किवा अटीचे उल्लघन झाल्यास महानगरपालिकेस प्रशिक्षण रद्द करण्याचा किवा देय कपात करण्याचा अधिकार राहील.
26. देय प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर व आवशक कागदपत्रे पडताळणी झाल्यानंतरच आदा करण्यात येईल.
27. प्रशिक्षण संस्था सर्व लागू शासन नियम, कर कायदे व कामगार कायद्यांचे पालन करेल.
28. कोणत्याही प्रकारचा उपकरार (Sub-contract) महानगरपालिकेच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

29. प्रशिक्षण संस्था प्रशिक्षणार्थींना रोजगार/स्वयंरोजगाराबाब त आवश्यक मार्गदर्शन करेल.

30. महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे प्रशिक्षण संस्थेस बंधनकार रहिल्.

31.. निविदा धारकाची मागील तीन आर्थिक वर्षाची एकुण उलाढाल सरासरी किमान निविदा रक्कमच्या असणे आवश्यक आहे. सनदी लेखापाल यांचे Turnover (UDIN क्रमांकासह) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

32. आर्थिक वर्ष सन २०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२५ या तीन वर्षातील फर्मच्या उलाढालीचे ताळेबंद अहवाल (फक्त Balance Sheet) आवश्यक आहे.

33. आर्थिक वर्ष २०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२५ या तीन वर्षाचे आयकर भरणा कागदपत्र (Income Tax Return Document) आवश्यक आहे.

34. महाराष्ट्र राज्यातील शासकीय/निमशासकीय कार्यालयात निविदा रक्कमेच्या ५०% पर्यंत नमुद प्रशिक्षण अथवा तत्सम प्रशिक्षण राबविल्याचे मागील तीन वर्षातील अनुभव प्रमाणपत्र किंवा पुरवठा आदेशाच्या छायांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.

35. व्यवसाय कर भरणा केलेचे छायांकित प्रत स्वक्षांकित असणे आवश्यक आहे.

36. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

37. बँक खात्याचा तपशील असणे आवश्यक आहे.

38. निविदाधारक हा महाराष्ट्र राज्यातील अधिकृत व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायडर असणे आवश्यक आहे.

39. निविदा धारकाचे ISO प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

40. CVC Integrity Pledge प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

41. निविदाधाराकांचे नाव शासनाच्या शासकीय किंवा निमशासकीय संस्थे मध्ये काळया यादीत (Black List) नसल्याचे तसेच निविदाधारक अथवा फर्मवर कोणताही प्रकारचा गुन्हा दाखल झालेला नाही याबाबत रु.500/- च्या मुद्रांकित शुल्का वर रजिस्टर नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील.

42. L-1 निविदाधारकाने शासन नियमानुसार योग्य त्या रक्कमेचा मुद्रांक शुल्क करारनामा या कार्यालयाशी करणे झज बंधनकारक राहील.

43. प्रशिक्षणा बाबतचे सर्व खर्च प्रति लाभार्थी निविदा धारकांने बघावा लागणार.

44.आपल्या इकडील प्रशिक्षण कालावधित इचलकरंजी शहरामध्ये इतर ठिकाणी सदर संस्थेचे असे प्रशिक्षण चालू नाही याचे हमीपत्र बधंणकारक आहे.

45. १०० लाभार्थी पेक्ष्या जास्त लाभार्थी झाल्यास बिल अदा करण्याची जवावदारी संस्थेचे/निविदादारक याचे राहील.

46. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंत सर्व व्यवस्थापनाची जवाबदारी निविदा धारकांवर राहील.

Scanned with OKEN Scanner